


सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २० • शनिवार दि.१० ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# दिल्लीत अभूतपूर्व नाकाबंदी ;पोलीस छावणीचे स्वरुप

**नवी दिल्ली:मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून कॉकरोच जनता पार्टीने (सीजेपी) पुकारलेल्या आंदोलनाने शनिवारी राजधानी दिल्लीचे राजकीय वातावरण तापले. जंतर-मंतरवर आंदोलन करण्याची तयारी सुरू असतानाच सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके, आशुतोष रांका आणि सौरव दास यांना दिल्ली विमानतळावर पोलिसांनी ताब्यात घेतले. पक्षाच्या प्रमुख नेत्यांवर कारवाई झाल्याने आंदोलनाची सूत्रे विस्कळीत होतील, अशी परिस्थिती निर्माण झाली; मात्र दिपके यांनी अजिंक्य शिंदे यांच्याकडे नेतृत्व सोपविण्याची घोषणा करत आंदोलनावर ठाम असल्याचा निर्धार व्यक्त केला आहे. दरम्यान दिल्लीला पोलीस छावणीचे स्वरुप आले असून देशभरातून हजारो आंदोलनकर्ते दाखल झाले आहेत. ठिकठिकाणी पोलीस आंदोलकर्त्यांना ताब्यात घेत आहे. दिल्ली पोलीसांनी दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, प.बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासह अनेक बड्या नेत्यांना ताब्यात घेतले आहे. तरी देखील जंतरमंतरवर तरुणांचा मोठा जनसमुदाय दाखल झाला आहे.**

### विमानतळावरच कारवाई;नेत्यांचा निषेध

मुंबईहून दिल्लीला आलेल्या विमानातच पोलिसांनी प्रवेश करून दिपके, रांका आणि दास यांना ताब्यात घेतल्याचा दावा सीजेपीकडून करण्यात आला. इतर प्रवाशांना बाहेर जाण्याची परवानगी देण्यात आली; मात्र या तिघांना पोलिसांनी रोखले. या कारवाईचा निषेध करत त्यांनी इन्कलाब जिंदाबादच्या घोषणा दिल्या. दिपके यांनी सरकारवर दडपशाहीचा आरोप केला. दरम्यान, या कारवाईमागील कारण आणि ताब्यात घेतलेल्या नेत्यांबाबतची पुढील कायदेशीर प्रक्रिया याविषयी अधिकृत तपशील स्पष्ट झालेला नाही.

## सीजेपी आंदोलनावर ठाम,आंदोलकांचे अटकसत्र

### जंतर-मंतरकडे कूच रोखण्यासाठी बंदोबस्त

सीजेपीच्या आंदोलनाला दिल्ली पोलिसांनी परवानगी नाकारल्याने राजधानीतील संवेदनशील भागांत सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली. जंतर-मंतर परिसरात बॅरिकेड्स उभारण्यात आले असून, दिल्लीच्या सीमांवरही तपासणी आणि नाकेबंदी करण्यात आल्याचे वृत्त आहे. आंदोलनात सहभागी होण्यासाठी विविध राज्यांतून दिल्लीकडे येणाऱ्या कार्यकर्त्यांना वाटेतच ताब्यात घेतले जात असल्याचा आरोप सीजेपीने केला आहे.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आंदोलनाला परवानगी नाकारण्यात आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. मात्र, कार्यकर्त्यांना रोखण्याच्या कारवाईवरून पक्ष आणि प्रशासन यांच्यात संघर्षाची शक्यता निर्माण झाली आहे. वाहतूक व्यवस्थेतील बदल आणि सुरक्षा निर्बंधांमुळे दिल्लीतील नागरिकांनाही गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो. आंदोलनाला परवानगी नाकारण्यात आल्याने आणि प्रमुख नेत्यांना ताब्यात घेतल्याने सीजेपीसमोर नवे आव्हान ***पान ४ वर***




# भाजपच्या साडीवाटप कार्यक्रमात महिलांचा गोंधळ


(छाया : करणसिंह बैस)

नांदेड/प्रतिनिधी-भाजपच्या सेवा संकल्प अभियाना अंतर्गत अंगणवाडी सेविका सन्मान कार्यक्रमात साडी वाटप कार्यक्रमात साड्यांसाठी महिलांमध्ये झटापट झाल्याने एकच गोंधळ उडाला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या त्यांच्या राजकीय कारकिर्दीस पंचवीस वर्ष पूर्ण झाल्याबद्दल भाजपच्यावतीने देशभरात सेवा संकल्प अभियाना अंतर्गत विविध कार्यक्रम घेतले जात आहेत. भाजपचे महानगराध्यक्ष आ.अमरनाथ राजूरकर यांच्या वतीने आज (शनिवार) सकाळी कुसुम सभागृहात अंगणवाडी सेविकांसाठी 'अंगणवाडी सेविका सन्मान' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला खा.अशोक चव्हाण, खा.डॉ.अजित गोपछडे, माजी मंत्री डी.पी.सावंत, महापौर सौ.कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष चैतन्य देशमुख, नगरसेविका शांभवी साले यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित होते. उपस्थित मान्यंवरांच्या हस्ते काही अंगणवाडी सेविकांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या. साड्यांसाठी महिलांनी एकच गर्दी केली. संयोजकांनी साड्या कमी आणल्यामुळे गोंधळ उडाला. साड्या घेण्यासाठी महिलांमध्ये चढाओढ निर्माण झाली. एकमेकींच्या हातातून साड्या महिला हिसकावून घेत होत्या. महिलांच्या गोंधळामुळे संयोजकांसह भाजप पदाधिकाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली.

# महाटी घाटावर कारवाई;चार कोटींचा ऐवज जप्त



नांदेड/प्रतिनिधी-मौजे महाटी शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून अवैधरित्या उपसा करणाऱ्या घाटावर पोलीस उपमहानिरिक्षक कार्यालयातील पोलीस पथकाने शुक्रवारी रात्री धाड टाकुन ४ कोटी १३ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

मौजे महाटी शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून सर्रासपणे रेतीचा अवैध उपसा रात्रं-दिवस सुरु होता. यामध्ये राजकीय पक्षाचे काही कार्यकर्ते गुंतलेले आहेत. अवैध रेती उपसा संदर्भात विशेष पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांच्याकडे लेखी स्वरुपात तक्रारी करण्यात आल्या होत्या. पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशावरुन पोलीसाच्या एका पथकाने शुक्रवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास महाटी परिसरातील रेती घाटावर छापा टाकला. गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करणारे एक फायबर बोट, पाच हायवा, एक टिपर, सहा जेसीबी मशिन, ६५ ब्रास रेतीचा साठा असा ४ कोटी १३ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी मुदखेड पोलीस ठाण्यात शिवराज संभाजी ढगे, तुळशीराम शामराव हनुमंते, सदाशिव गोणेवाड, बळी दत्ताराम ढगे, गुलाब जाधव, परमेश्वर जाधव, अवधुत गोविंदराव ढगे, उद्धव राजु जाधव, ज्ञानेश्वर आनंदराव जाधव, गजानन राजू जाधव यांच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे सर्व आरोपी फरार असून यापैकी काही जण रेती माफिया आहेत. ***पान ४ वर***

# दसरा सणास रविवार पासून प्रारंभ

## दशहरा महातम पाठाचे ठीकठिकाणी आयोजन होणार

रविन्द्रसिंग मोदी

नांदेड:दरवर्षी प्रमाणे यंदाही गुरुद्वारा तखत सचखंड हजुरसाहिब येथे दहा दिवसीय पारंपरिक दशहरा हल्ला महल्ला सणास रविवारी सुरुवात होत आहे. तसेच शहर आणी भोवतालच्या गुरुद्वारात व इतर काही खासगी ठिकाणी या निमित्त ''दशहरा महातम श्री चंडी साहिब पाठ'' सुरु होत आहेत.

नांदेडच्या गुरुद्वारा तखत सचखंड श्री हजुरसाहिब मध्ये दरवर्षी दसरा एक पारंपरिक सण म्हणून साजरा केला जातो. या सणास धार्मिक महत्व व परंपरा आहे. या शिवाय गुरुद्वारा मातासाहिब देवाजी, गुरुद्वारा सिख छावनी, गुरुद्वारा शहीद बाबा भुजंग सिंघजी शहीदपुरा, बुँगा बंजारगान बंजारा आश्रम, भाई अहलादा सिंघ भाई प्रहलादा सिंघ नगीनाघाट, गुरुद्वारा गोबिंद बाग साहिब, श्री गुरु नानक नगर नंदिग्राम सोसायटी सह अनेक ठिकाणी दशहरा महातम पाठ आयोजित करण्यात येत आहे. दसरा सणास समर्पित श्री दसम ग्रन्थ साहिब अंतर्गत वीर रस बाणीचे पठन संपूर्ण दहा दिवस केले जाते. दररोज बाणी वाचन, कीर्तन, आरती, अरदास व लंगर सारखे कार्यक्रम नियमितपणे पार पाडले जातात. आणी मोठ्या संख्येत भाविकगण पाठ श्रवण करण्यासाठी उपस्थित राहतात. म्हणून या सणास मोठे महत्व प्राप्त आहे. नांदेड मध्ये दसरा सण मोठ्या उत्साहाने साजरा होतो. येथे सण साजरा करण्यासाठी देशाविदेशातून भाविक उपस्थित राहतात. गुरुद्वारात दसरा रोजी पाठाचे समापन करण्यात येते. तसेच शस्त्रपूजन करण्यात येते. दहाव्या दिवशी दसरा सणास समर्पित पारंपरिक दशहरा हल्ला महल्ला यात्रा काढण्यात येते. नांदेडच्या गुरुद्वारात साजरा होणाऱ्या दशहरा हल्ला-महल्ला सणात सहभागी होण्यासाठी ***पान ४ वर***


(संग्रहित छायाचित्र)



# 'सर्वोच्च' फटकारे!

**लोकशाहीमध्ये आंदोलन करणे हा नागरिकांचा अधिकार आहे आणि कायदा-सुव्यवस्था राखणे ही सरकारची जबाबदारी आहे. मात्र, आंदोलनाच्या शक्यतेनेच सरकारच्या हातापायाला कंप सुटत असेल आणि आंदोलकांना रोखण्यासाठी सामान्य नागरिकांची दैनंदिन जीवनवाहिनीच बंद करण्याची वेळ येत असेल, तर सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे राहणे स्वाभाविक आहे. केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभाराविरोधात 'कॉकरोच जनता पार्टी'ने दिल्लीत आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर केंद्र सरकारने केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर सर्वोच्च न्यायालयाने लगावलेले फटकारे म्हणजे सत्तेच्या मर्यादांची करून दिलेली जाणीव आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कारभाराविरोधात आंदोलनाची घोषणा होताच दिल्लीमध्ये सुरक्षेच्या नावाखाली निर्बंधांचे जाळे विणले जाऊ लागले. दिल्ली मेट्रोच्या ५७ स्थानकांवरील प्रवेश-निर्गमनावर निर्बंध आणि राजधानीकडे येणाऱ्या काही रेल्वेगाड्यांच्या रद्दबातलतेमुळे सामान्य नागरिकांच्या प्रवासाचा प्रश्न निर्माण झाला. या आंदोलनाला इंडिया आघाडीनेही पाठिंबा देत गेल्या दोन-तीन दिवसांपासून दिल्लीत आंदोलनाची भूमिका घेतली आहे. आंदोलन करणारे काही लोक असतील; परंतु त्याची शिक्षा हजारो कर्मचारी, विद्यार्थी, रुग्ण आणि रोजीरोटीसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना का? आंदोलन रोखण्याच्या प्रयत्नात संपूर्ण शहराच्या जनजीवनालाच वेठीस धरणे हा कोणता न्याय? याच प्रश्नावर ९ ऑक्टोबर रोजी सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि संबंधित यंत्रणांना स्पष्ट शब्दांत सुनावले. 'माशी मारण्यासाठी हातोडा वापरू नका', या आशयाच्या कठोर निरीक्षणातून न्यायालयाने प्रतिबंधात्मक उपाय आणि अतिरंजित कारवाई यांतील फरक अधोरेखित केला. सुरक्षेची गरज नाकारता येत नाही; मात्र तिच्या नावाखाली नागरिकांच्या दैनंदिन गरजांवर गदा आणणे योग्य नाही. मेट्रो आणि रेल्वे सेवा पूर्णपणे रोखण्याऐवजी आवश्यक ते नियमन करावे आणि सामान्य नागरिकांची गैरसोय कमीत कमी ठेवावी, अशी भूमिका न्यायालयाने मांडली. सत्तेचा वापर किती प्रमाणात करायचा, याबाबतचा हा स्पष्ट संदेश आहे. दिल्लीतील घडामोडी केवळ राजधानीपुरत्या मर्यादित नाहीत. महाराष्ट्रातील पुणे शहरातही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कथित पेपरफुटी आणि परीक्षेतील अनियमिततेच्या विरोधात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. आंदोलनाच्या नवव्या दिवशी, ९ ऑक्टोबर रोजी, पोलिसांनी १५ आंदोलकांविरुद्ध गुन्हे दाखल केले. यामध्ये १४ विद्यार्थ्यांचा समावेश असल्याचे वृत्त आहे. आंदोलनासाठी दिलेली परवानगी रद्द केल्यानंतरही रस्त्यावर आंदोलन केल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला, अशी पोलिसांची भूमिका आहे. दुसरीकडे, विद्यार्थ्यांनी परीक्षेतील कथित गैरव्यवहाराचे पुरावे तपास यंत्रणेला दिल्यानंतर आपला आवाज दाबण्यासाठी कारवाई केली जात असल्याचा आरोप केला आहे. या आरोपांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. येथे प्रश्न असा आहे की, परीक्षा व्यवस्थेतील कथित अनियमिततेबाबत प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शंकांचे समाधानकारक उत्तर मिळते आहे का? स्पर्धा परीक्षांसाठी वर्षानुवर्षे मेहनत घेणाऱ्या तरुणांचे भविष्य या परीक्षांवर अवलंबून असते. पेपरफुटीचा संशय निर्माण झाला, तर त्याची पारदर्शक चौकशी आणि दोषींवर कारवाई होणे आवश्यक आहे. त्याच वेळी आंदोलन करताना कायद्याचे पालन करणेही विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे. परंतु कायद्याची अंमलबजावणी करताना प्रशासनाने आंदोलनामागील मूळ प्रश्न दुर्लक्षित करता कामा नये. गुन्हे दाखल झाले म्हणजे प्रश्न संपले, असे होत नाही. दिल्लीतील इंडिया आघाडीचे आंदोलन असो किंवा पुण्यातील एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन, दोन्ही घटनांमध्ये प्रशासनासमोर एकच मूलभूत प्रश्न उभा राहतो, आंदोलन का उभे राहते आणि त्यामागील असंतोष दूर करण्यासाठी काय केले जाते? प्रत्येक आंदोलनाला कायदा-सुव्यवस्थेच्या चष्म्यातून पाहणे आणि आंदोलनकर्त्यांना प्रतिबंधांनी घेरणे हा सोपा मार्ग असू शकतो; पण तो लोकशाहीचा मार्ग नाही. आंदोलकांनीही सार्वजनिक जीवन विस्कळीत होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. मात्र, प्रशासनानेही प्रतिबंधात्मक कारवाई प्रमाणबद्ध आणि आवश्यक तेवढीच ठेवली पाहिजे. लोकशाहीत सरकार किती शक्तिशाली आहे, यापेक्षा ते जनतेच्या प्रश्नांना किती संवेदनशीलतेने सामोरे जाते, हे अधिक महत्त्वाचे असते. निवडणूक आयोगावरील प्रश्न असोत किंवा स्पर्धा परीक्षांतील कथित गैरव्यवहार, त्यांची उत्तरे पारदर्शक प्रक्रियेतून मिळाली पाहिजेत. आरोप सिद्ध होण्यापूर्वी कोणालाही दोषी ठरवता येत नाही; पण आरोपांची चौकशी टाळूनही चालत नाही. सर्वोच्च न्यायालयाचे फटकारे केवळ दिल्लीतील यंत्रणांसाठी नाहीत, तर देशभरातील सत्ताधारी आणि प्रशासनासाठी धडा आहेत. नागरिक आंदोलन का करतात, त्यांच्या प्रश्नांचे निराकरण वेळेत का होत नाही आणि विरोधाचा आवाज ऐकून घेण्याऐवजी तो रोखण्याची प्रवृत्ती का वाढते आहे, याचे आत्मपरीक्षण झाले पाहिजे. माशी मारण्यासाठी हातोडा उचलण्याऐवजी असंतोषाची कारणे शोधली, तरच लोकशाहीवरील जनतेचा विश्वास टिकेल. अन्यथा, प्रत्येक आंदोलनानंतर न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागणे, हीच प्रशासकीय व्यवस्थेची मोठी शोकांतिका ठरेल.**

# कनेक्टेड मुले, डिस्कनेक्टेड नाती!

(डिजिटल जगाशी जोडलेली मुले प्रत्यक्ष आयुष्यात एकाकी होत असतील,तर पालकांनी आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.)




प्रा.डॉ.बालाजी पोतुलवार

माझा मुलगा सतत मोबाईलमध्येच असतो. अभ्यासाकडे लक्ष नाही, बाहेर खेळायला जात नाही, घरात कोणाशी बोलत नाही. मोबाईल बाजूला ठेवायला सांगितला की चिडचिड करतो! एका पालकाची ही तक्रार आज अनेक घरांमध्ये ऐकायला मिळते. मुलांच्या हातातील मोबाईलविषयी पालकांची चिंता रास्त आहे; मात्र या चिंतेच्या मुळाशी जाण्यापूर्वी प्रत्येकाने आपल्या घरातील परिस्थितीकडेही एकदा डोळसपणे पाहायला हवे. मुलाला मोबाईलपासून दूर राहण्याचा उपदेश करणारी आई स्वतः इन्स्टाग्रामवरील रील्स पाहण्यात तासन्‌तास रमलेली असते, तर वडील मोबाईलवरील व्हिडिओ, मालिका किंवा इतर मनोरंजनाच्या कार्यक्रमांमध्ये गुंतलेले असतात. अशा वेळी मुलांनी केवळ पालकांचे शब्द ऐकावेत आणि त्यांच्या कृतींकडे दुर्लक्ष करावे, अशी अपेक्षा कशी करता येईल? घरात मुलांसाठी उपदेशाची शाळा भरलेली असते; पण मोठ्यांच्या कृतींच्या वर्गात मात्र वेगळाच अभ्यासक्रम सुरू असतो. मुले उपदेशाच्या भिंतीवर लिहिलेली वाक्ये वाचून नव्हे, तर घरातील वर्तनाच्या आरशात स्वतःला घडवत असतात. म्हणूनच मुलांच्या मोबाईल वापराविषयी बोलताना पालकांनी आधी स्वतःच्या सवयी तपासणे आवश्यक आहे.

डिजिटल क्रांतीने मानवी जीवनाच्या अनेक क्षेत्रांत मोठे बदल घडवून आणले आहेत. माहिती, ज्ञान, मनोरंजन आणि संवाद यांची असंख्य दालने मोबाईलच्या एका छोट्याशा पडद्यावर उपलब्ध झाली आहेत. या तंत्रज्ञानाचे फायदे नाकारता येणार नाहीत. मात्र, त्याचा अतिवापर मुलांच्या बालपणावर, अभ्यासावर, शारीरिक हालचालींवर आणि सामाजिक संबंधांवर परिणाम करू लागला, तर त्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. युनेस्कोच्या जागतिक शिक्षण देखरेख अहवालाशी संबंधित आकडेवारीनुसार, मार्च २०२६ पर्यंत जगातील ११४ शिक्षणव्यवस्थांनी शाळांमध्ये मोबाईल फोन वापरावर राष्ट्रीय पातळीवर निर्बंध घातले होते. हे प्रमाण सुमारे ५८ टक्के असल्याचे नमूद केले जाते. जून २०२३ मध्ये हे प्रमाण सुमारे २४ टक्के, तर २०२५ च्या सुरुवातीला सुमारे ४० टक्के होते. वर्गातील एकाग्रता वाढवणे, सायबर छळाला आळा घालणे आणि विद्यार्थ्यांचे मानसिक व सामाजिक स्वास्थ्य जपणे, ही अशा निर्बंधांमागील महत्त्वाची कारणे आहेत. अर्थात, शाळांमधील मोबाईल वापरावरील निर्बंध म्हणजे मुलांनी प्रत्येक परिस्थितीत मोबाईल वापरूच नये, असा त्याचा अर्थ नाही. प्रश्न तंत्रज्ञानाचा नसून त्याच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याचा आहे. तंत्रज्ञान मुलांच्या ज्ञानवृद्धीचे साधन ठरावे; त्यांच्या वेळेवर, विचारांवर आणि भावविश्वावर वर्चस्व गाजवणारे माध्यम बनू नये. एकेकाळी मुलांच्या बालपणाचे केंद्र घराजवळचे मैदान, शाळेचे पटांगण आणि मित्रांचा सहवास हे असायचे. क्रिकेट, कबड्डी, खो-खो, फुटबॉल अशा खेळांमधून मुले केवळ शारीरिक व्यायामच करीत नसत, तर संघभावना, सहकार्य, शिस्त, पराभव स्वीकारण्याची वृत्ती आणि पुन्हा प्रयत्न करण्याची जिद्दही शिकत असत. आज अनेक मुलांच्या बोटांत खेळाचा उत्साह आहे; पण तो मैदानावर नव्हे, तर मोबाईलच्या स्क्रीनवर धावताना दिसतो. व्हिडिओ गेममध्ये नवनवीन पातळ्या, गुण, बक्षिसे आणि स्पर्धा यांची रचना अशा प्रकारे केलेली असते की, पुढचा टप्पा गाठण्याची ओढ कायम राहते. खेळ थांबवण्यास सांगितल्यावर काही मुलांची चिडचिड होते, राग अनावर होतो किंवा ती पुन्हा खेळण्यासाठी हट्ट धरतात. परिणामी अभ्यासासाठी राखून ठेवलेला वेळ कमी होतो, झोपेच्या वेळापत्रकात बदल होतो आणि प्रत्यक्ष जीवनातील खेळांबद्दलची आवडही कमी होऊ शकते. काही खेळांमध्ये अतिरिक्त सुविधा, गुण किंवा वस्तू मिळवण्यासाठी पैसे खर्च करण्याचे पर्याय असतात. मुलांना या खर्चाचे आर्थिक परिणाम समजतीलच असे नाही. त्यामुळे पालकांनी मुलांच्या गेम खेळण्याच्या वेळेवर, त्यासाठी होणाऱ्या खर्चावर आणि त्याचा अभ्यास, झोप व वर्तनावर होणाऱ्या परिणामांवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक व्हिडिओ गेम वाईट असतो असे नाही; परंतु खेळाचे नियंत्रण मुलांच्या हातात आहे की खेळानेच मुलांवर नियंत्रण मिळवले आहे, हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

व्हिडिओ गेमबरोबरच इन्स्टाग्रामसारख्या समाजमाध्यमांनीही मुलांच्या मनावर प्रभाव टाकण्यास सुरुवात केली आहे. या माध्यमांवर किती लाईक्स मिळाले, किती जणांनी आपली पोस्ट पाहिली, किती फॉलोअर्स वाढले, यावरून काही मुलांना स्वतःच्या लोकप्रियतेचे मोजमाप करावेसे वाटते. इन्स्टाग्रामच्या जगात लोकप्रियतेचे एक वेगळेच चलन चालते. एखाद्या मित्राकडे महागडा मोबाईल आहे, कोणीतरी आकर्षक कपडे घालून छायाचित्रे टाकली आहेत किंवा एखाद्याच्या व्हिडिओला भरपूर प्रतिसाद मिळाला आहे, तर त्याच्याशी स्वतःची तुलना करण्याची प्रवृत्ती वाढू शकते. अशा तुलनेतून न्यूनगंड, असमाधान, असूया किंवा स्वतःबद्दल कमीपणाची भावना निर्माण होऊ शकते. लोकप्रियता मिळवण्याच्या नादात काही मुले धोकादायक कृतींचे व्हिडिओ तयार करतात किंवा इतरांचे लक्ष वेधून घेण्यासाठी अविचारी वर्तन करतात. यामागे केवळ समाजमाध्यमेच कारणीभूत असतात असे नाही. पालकांचा अपुरा वेळ, एकटेपणा, अभ्यासाचा ताण, मित्रांशी संवादाचा अभाव आणि भावनिक गरजा पूर्ण न होणे, या गोष्टीही मुलांना आभासी जगाकडे अधिक आकर्षित करू शकतात. म्हणूनच मुलांच्या हातातून मोबाईल हिसकावून घेणे हा एकमेव उपाय नाही. त्यांना समजून घेणे, त्यांच्या अडचणी ऐकून घेणे, मित्रांसोबत वेळ घालवण्याची संधी देणे आणि छंद, खेळ, वाचन, संगीत किंवा कलात्मक उपक्रमांकडे वळवणे अधिक महत्त्वाचे आहे. मुलांच्या वर्तनात होणारे बदल पालकांनी गांभीर्याने ओळखायला हवेत. रात्री उशिरापर्यंत जागणे, सकाळी उठण्यास त्रास होणे, अभ्यासातील कामगिरी खालावणे, घरातील संवाद कमी होणे, कुटुंबीयांपासून दूर राहणे किंवा मोबाईल बाजूला ठेवण्यास तीव्र विरोध करणे, ही काही संभाव्य संकेत आहेत. मूल खोलीत बसून अभ्यास करत आहे, असे पालकांना वाटत असताना ते गेम खेळत असेल, रील्स पाहत असेल किंवा अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन संवाद साधत असेल. मात्र, प्रत्येक बदलाचा अर्थ मोबाईलचे व्यसन असा लावणेही योग्य नाही. मुलांच्या वर्तनामागे अभ्यासाचा ताण, मैत्रीतील समस्या, भावनिक अस्वस्थता किंवा इतर अडचणी असू शकतात. त्यामुळे केवळ ओरडणे, शिक्षा करणे किंवा सतत संशय घेणे याऐवजी मुलांशी शांतपणे संवाद साधणे गरजेचे आहे. मुलांना प्रश्न विचारताना त्यांची चौकशी सुरू असल्याची भावना निर्माण होऊ नये; उलट आपले म्हणणे ऐकून घेतले जाईल, असा विश्वास त्यांना वाटला पाहिजे. अतिवापरामुळे काही मुलांना मोबाईल बाजूला ठेवणे कठीण जाऊ शकते. गेममधील बक्षिसे, समाजमाध्यमांवरील प्रतिसाद आणि सतत उपलब्ध होणारे नवे व्हिडिओ यांमुळे पुन्हा पुन्हा स्क्रीनकडे वळण्याची सवय बळावू शकते. अशा वर्तनाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक असले, तरी प्रत्येक अतिवापराला पदार्थांच्या व्यसनासारखेच संबोधणे योग्य नाही. वापरावर नियंत्रण ठेवता येते का आणि त्याचा दैनंदिन जीवनावर किती परिणाम होतो, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

लहान मुलांच्या बाबतीत स्क्रीनवापराचा प्रश्न अधिक संवेदनशील आहे. बालपणी भाषा शिकणे, प्रश्न विचारणे, चेहऱ्यावरील भाव ओळखणे, इतरांशी खेळणे आणि संवाद साधणे या प्रक्रिया प्रत्यक्ष अनुभवांतून विकसित होत असतात. लहान मूल शांत राहावे म्हणून त्याच्या हातात मोबाईल देण्याची सवय लागली, तर पालकांशी बोलणे, गोष्टी ऐकणे, खेळातून शिकणे आणि आजूबाजूच्या जगाशी संवाद साधणे यासाठी मिळणाऱ्या संधी कमी होऊ शकतात. अतिप्रमाणातील स्क्रीनवापर आणि प्रत्यक्ष संवादाचा अभाव यांचा भाषिक व सामाजिक विकासाशी संबंध असू शकतो; मात्र स्क्रीनवापरामुळेच एखाद्या मुलाला ऑटिझम होतो, असा निष्कर्ष काढणे चुकीचे आहे. व्हर्च्युअल ऑटिझम हा स्वतंत्रपणे मान्यताप्राप्त वैद्यकीय निदानप्रकार नाही. मुलाच्या बोलण्यात विलंब, संवादातील अडचणी किंवा विकाससंबंधी चिंता जाणवत असल्यास स्वतःहून निदान करण्याऐवजी बालरोगतज्ज्ञ किंवा बालविकास तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. मुलांना शांत ठेवण्यासाठी मोबाईलचा आधार घेण्यापेक्षा त्यांच्याशी बोलणे, गोष्टी सांगणे, चित्रांची पुस्तके वाचून दाखवणे, प्रश्नांची उत्तरे देणे आणि त्यांच्या खेळात सहभागी होणे अधिक उपयुक्त आहे. पालकांचा वेळ मुलांच्या विकासासाठी महत्त्वाचा असतो; मोबाईल हा त्या वेळेचा पर्याय ठरू नये.स्क्रीनच्या अतिवापराचे परिणाम केवळ मानसिक किंवा सामाजिक पातळीवर मर्यादित राहत नाहीत; त्यांचा शारीरिक स्वास्थ्यावरही परिणाम होऊ शकतो. दीर्घकाळ एकाच जागी बसून राहिल्याने शारीरिक हालचाली कमी होतात. मान व पाठ दुखणे, डोळ्यांत कोरडेपणा किंवा थकवा जाणवणे, झोपेच्या वेळेत बदल होणे आणि वजन वाढण्याचा धोका निर्माण होणे, अशा समस्या उद्भवू शकतात. विशेषतः रात्री झोपण्यापूर्वी मोबाईल वापरण्याची सवय झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम करू शकते. जागतिक आरोग्य संघटनेच्या लहान मुलांच्या हालचाली व स्क्रीनवापरासंबंधीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, एक वर्षाखालील बालकांसाठी बसून स्क्रीन पाहण्याचा वेळ शिफारस केलेला नाही. दोन वर्षांच्या मुलांसाठी असा वेळ दिवसाला एका तासापेक्षा अधिक नसावा; त्यापेक्षा कमी वेळ अधिक चांगला मानला जातो. तीन ते चार वर्षांच्या मुलांसाठीही दिवसातील स्क्रीनवापर एका तासापेक्षा कमी ठेवणे अधिक योग्य मानले जाते. वयानुसार मर्यादा ठरवताना मुलाच्या विकासाच्या गरजा, शैक्षणिक वापर आणि दैनंदिन दिनक्रम यांचा विचार करणे आवश्यक आहे. पालकांनी जेवताना मोबाईल बाजूला ठेवावा, अभ्यासाच्या वेळी अनावश्यक स्क्रीनवापर टाळावा आणि झोपण्याच्या किमान एक तास आधी स्क्रीन बंद करण्याची सवय लावावी. शक्य असल्यास रात्री मोबाईल व इतर उपकरणे मुलांच्या शयनकक्षाबाहेर ठेवावीत. मुलांच्या आरोग्याची काळजी म्हणजे केवळ आजार झाल्यावर औषध देणे नव्हे; आरोग्याला पोषक सवयी बालपणापासून रुजवणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

मोबाईलच्या प्रश्नाला आर्थिक बाजूही आहे. मुलांच्या मित्रांकडे विशिष्ट कंपनीचे किंवा महागड्या किमतीचे मोबाईल आहेत म्हणून आपल्याही मुलाला तसाच मोबाईल हवा, अशी मागणी अनेकदा केली जाते. मुलांचा हट्ट पुरवण्यासाठी काही पालक आर्थिक परिस्थितीचा पुरेसा विचार न करता हप्त्यांवर मोबाईल घेतात किंवा कर्जाचा भार स्वीकारतात. मुलांना मित्रांमध्ये कमीपणा वाटू नये, त्यांना वाईट वाटू नये, या भावनेतून पालक असे निर्णय घेतात. पण प्रत्येक मागणी पूर्ण करणे म्हणजे मुलांवर प्रेम करणे, असा अर्थ होत नाही. गरज आणि चैनीची वस्तू यांतील फरक मुलांना समजावून सांगणे, पैशाचे मूल्य शिकवणे आणि आपल्या आर्थिक क्षमतेनुसार निर्णय घेणे, हीदेखील पालकांची जबाबदारी आहे. काही वेळा मोबाईल नाकारल्यावर मुले आत्महत्येची किंवा स्वतःला इजा करण्याची धमकी देतात. अशा धमकीकडे केवळ हट्ट किंवा भावनिक दबाव म्हणून दुर्लक्ष करू नये. मुलाच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन त्याच्याशी संवेदनशीलतेने संवाद साधावा आणि गरज भासल्यास मानसिक आरोग्य तज्ज्ञांची मदत घ्यावी. धमकीच्या भीतीने महागडा मोबाईल विकत घेणे हा समस्येचा कायमस्वरूपी उपाय नाही. त्याच वेळी मुलाला अपमानित करणे, धमकावणे किंवा त्याच्या भावनांची थट्टा करणेही टाळले पाहिजे. मुलांच्या भावनिक गरजा समजून घेताना योग्य मर्यादा राखणे आवश्यक आहे. समाज माध्यमांच्या वापरासोबत ऑनलाइन सुरक्षिततेचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. बनावट खाती तयार करून किंवा खोटी ओळख सांगून काही व्यक्ती मुलांशी मैत्री करतात, त्यांचा विश्वास संपादन करतात आणि नंतर वैयक्तिक माहिती, छायाचित्रे किंवा इतर तपशील मिळवण्याचा प्रयत्न करतात. या माहितीचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मुलांना घराचा पत्ता, शाळेचे नाव, फोन क्रमांक, वैयक्तिक छायाचित्रे किंवा इतर गोपनीय माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नये, हे स्पष्टपणे शिकवले पाहिजे. कोणी धमकी देत असेल, खासगी छायाचित्रांची मागणी करत असेल किंवा प्रत्यक्ष भेटण्याचा आग्रह धरत असेल, तर त्याबाबत विश्वासू प्रौढ व्यक्तीला त्वरित सांगावे. अशा वेळी मुलांना दोष देण्याऐवजी त्यांना मदत मिळेल, असा विश्वास देणे अत्यावश्यक आहे. ठाणेनागपूरसारख्या ठिकाणांशी संबंधित ऑनलाइन गैरप्रकारांच्या चर्चांमधूनही डिजिटल व्यवहारांतील सावधगिरीचे महत्त्व अधोरेखित होते; मात्र कोणत्याही विशिष्ट घटनेविषयी निष्कर्ष काढताना अधिकृत माहितीची खातरजमा करणे आवश्यक आहे. मुलांना सायबर सुरक्षेचे शिक्षण देणे म्हणजे त्यांना घाबरवणे नव्हे, तर डिजिटल जगात सुरक्षितपणे वावरता येण्यासाठी आवश्यक विवेक आणि आत्मविश्वास देणे होय. मुलांच्या संगोपनात पालकांची भूमिका केवळ अन्न, वस्त्र, शिक्षण आणि सुविधा पुरवण्यापुरती मर्यादित नसते. मुलांमध्ये योग्य-अयोग्य यांची जाणीव, इतरांविषयी आदर, रागावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता आणि स्वतःच्या कृतींची जबाबदारी स्वीकारण्याची वृत्ती विकसित करणेही तितकेच आवश्यक आहे. मुलांच्या प्रत्येक चुकीला झाकून टाकणे किंवा त्यांना कोणत्याही परिस्थितीत दोषमुक्त ठरवणे म्हणजे प्रेम नव्हे. अर्थात, मुलांकडून घडणाऱ्या प्रत्येक चुकीसाठी पालकांनाच जबाबदार धरणेही योग्य नाही; परंतु मुलांच्या विचारांवर, सवयींवर आणि वर्तनावर घरातील वातावरणाचा प्रभाव पडतो, हे नाकारता येणार नाही. मुलांना चुका सुधारण्याची संधी देतानाच त्यांच्या कृतींचे परिणाम समजावून सांगणे गरजेचे आहे. शाळा, शिक्षक, मित्रपरिवार आणि समाज यांचाही मुलांच्या जडणघडणीत सहभाग असतो. त्यामुळे पालकांनी शाळेशी संपर्क ठेवावा, शिक्षकांशी संवाद साधावा आणि मुलांच्या डिजिटल सवयींबाबत आवश्यक ती जागरूकता निर्माण करावी. मुलांना केवळ मोबाईलपासून दूर ठेवण्यापेक्षा त्यांना प्रत्यक्ष जीवनाशी जोडणे अधिक महत्त्वाचे आहे.

यासाठी घरात मोबाईल वापरासंबंधी स्पष्ट आणि सर्वांना लागू होतील असे नियम असावेत. जेवताना, अभ्यास करताना आणि कुटुंबीयांशी संवाद साधताना मोबाईल बाजूला ठेवण्याची सवय लावावी. मुलांच्या वयानुसार स्क्रीनवापराची मर्यादा ठरवावी आणि त्या मर्यादेचे पालन पालकांनीही करावे. मुलांना बाहेर खेळण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, वाचनाची गोडी लावावी, चित्रकला, संगीत, नृत्य किंवा इतर छंद जोपासण्यासाठी संधी द्यावी. कुटुंबाने एकत्र घालवलेला वेळ वाढवावा. मुलांच्या मनात काय चालले आहे, त्यांना कोणत्या गोष्टींची भीती वाटते, त्यांना कोणत्या अडचणी येतात, हे समजून घेण्यासाठी संवादाची दारे उघडी ठेवावीत. शाळांमध्ये डिजिटल साक्षरता आणि सायबर सुरक्षिततेविषयी मार्गदर्शन व्हावे. पालक-शिक्षक संवादातून मुलांच्या वर्तनातील बदल समजून घेऊन योग्य वेळी मदत करता येऊ शकते. मोबाईल पूर्णपणे नाकारण्याऐवजी त्याचा समतोल, जबाबदार आणि सुरक्षित वापर शिकवणे हा अधिक व्यावहारिक मार्ग आहे. तंत्रज्ञानाचा प्रकाश घरात यावा; पण त्या प्रकाशाने घरातील माणसांचे चेहरे अंधुक होता कामा नयेत.शेवटी, प्रत्येक पालकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे : माझे मूल मोबाईल वापरत आहे की मोबाईल माझ्या मुलाला वापरत आहे? या प्रश्नाचे उत्तर शोधताना मुलांना दोष देण्यापूर्वी आपल्या सवयी, घरातील संवाद आणि मुलांना दिलेला वेळ यांचेही परीक्षण केले पाहिजे. मोबाईल, व्हिडिओ गेम आणि समाजमाध्यमे ही आधुनिक जीवनाचा भाग आहेत; त्यांच्यापासून मुलांना पूर्णपणे अलग ठेवणे शक्यही नाही आणि प्रत्येक वेळी आवश्यकही नाही. मात्र, या साधनांचा वापर मुलांच्या विकासाला पूरक ठरतो आहे की त्यांच्या बालपणातील खेळ, संवाद, संवेदना आणि नातेसंबंध हिरावून घेतो आहे, हे ओळखणे अत्यावश्यक आहे. मुलांच्या हातात मोबाईल देताना आपण त्यांच्या हातातून पुस्तक, खेळाचे मैदान, मित्रांचा सहवास आणि कुटुंबातील संवाद नकळत काढून घेत नाही ना, याचा विचार पालकांनी करावा. मुलांना डिजिटल जगाचे ज्ञान मिळू द्यावे; पण त्याच वेळी प्रत्यक्ष जगण्याचे भानही द्यावे. कारण स्क्रीनवर दिसणारे जग आकर्षक असले, तरी माणसांशी असलेली जिवंत नाती, प्रत्यक्ष अनुभव आणि भावनिक आधार यांची जागा कोणतेही तंत्रज्ञान घेऊ शकत नाही.आजची मुले डिजिटल जगात कनेक्टेड तर आहेत, पण कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर डिस्कनेक्टेड (एकटी) झाली आहेत. मोबाईलच्या या जाळ्यापासून मुलांना वाचवणे ही आता केवळ पालकांची इच्छा नाही, तर मुलांच्या अस्तित्वाची लढाई आहे.

(लेखक हे मराठी विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड येथे प्राध्यापक आहेत.प्र.९८२३४४४१७)

# शालेय पोषण आहाराच्या सुरक्षिततेसाठी मुख्याध्यापकांना मार्गदर्शन

देगलूर/प्रतिनिधी-शालेय पोषण आहार विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी निगडित असल्याने अन्नाची गुणवत्ता, स्वच्छता आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. याच अनुषंगाने पंचायत समिती देगलूर च्या शालेय पोषण आहार विभाग आणि अन्न व औषध प्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय पोषण आहार पात्र जिल्हा परिषद व खाजगी शैक्षणिक संस्थांचे शाळांच्या मुख्याध्यापकांसाठी अन्नसुरक्षा कायदाबाबत जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. रामपूर येथील ज्ञान सरस्वती इंग्लिश स्कूल येथे अन्नसुरक्षा मानके विनियम १२:२० प्रशिक्षण हा कार्यक्रम पार पडला. गटशिक्षणाधिकारी बालाजी गोडाजी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सत्रात अन्नसुरक्षेच्या विविध महत्त्वपूर्ण बाबीवर मार्गदर्शन करण्यात आले. या सूत्रात विठ्ठल लोंढे यांनी अन्नसुरक्षा मानके विनिमय प्रशिक्षण या विषयावर व अन्न सुरक्षित संबंधित नियम, अन्नसुरक्षा परवाना, स्वच्छतेचे निकष तशीच अन्न हाताळणी आणि सुरक्षितते संदर्भातील तांत्रिक बाबींची माहिती दिली. शालेय पोषण आहार तयार करताना वितरित करताना आवश्यक ते खबरदारी घेणे, स्वच्छतेचे नियम पाळणे आणि विद्यार्थ्यांना सुरक्षित व दर्जेदार आहार मिळेल याची दक्षता घेणे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शालेय पोषण आहार अधीक्षक कृष्णा तोटावार, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी हमीद दौलताबादी, शिक्षण विस्तार अधिकारी चैनपुरे, सर्व केंद्र समन्वयक, विशेष शिक्षक तसेच शालेय पोषण आहार पात्र शाळांचे मु.अ. उपस्थित होते. सूत्रसंचालन केंद्र समन्वयक माधव डाकोरे यांनी केले. तर मानूर येथील केंद्रीय मुख्याध्यापक अनिल कुमार वाघमारे यांनी आभार मानले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर, प्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, प्रमणध्वनी ९४२११९९०८८
E-mail: nandedwarta@gmail.com

# गोकुंदा जिल्हा परिषद गटात राजकीय रणधुमाळी

## दिनकर दहिफळेंच्या नावाची चर्चा;राष्ट्रवादीसमोर संघटन सावरण्याचे आव्हान

किनवट/प्रतिनिधी-आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर किनवट विधानसभा मतदारसंघातील गोकुंदा जिल्हा परिषद गटातील राजकीय घडामोडींना पुन्हा एकदा सुरुवात झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभुत्व असलेला मतदार संघ माजी आ. स्व. प्रदीप नाईकांच्या पश्चात खिळ खिळावस्थेकडे वाटचाल करीत असल्याने विस्कटलेली घडी सावरण्यासाठी श्रीमती बेबीताई नाईकांना प्रचंड परिश्रम उचलावे लागणार आहेत.





महायुती आणि महाविकास आघाडीच्या बॅनरखाली त्यातील घटकपक्ष एकसंध निवडणूक लढवणार की, स्वबळावर?, त्याची उकल अद्यापही झाली नसलीतरी प्रत्येक पक्षातील होतकरू मात्र स्वबळाच्या तयारीतून कंबर कसतांना दिसतोय. रा.काँ. च्या प्रकाश राठोडांनी आतापासूनच हातपाय गाळत मतदारांना भावनिक साद घालत ही शेवटची निवडणूक असल्याचा पड्या राग आळवायला सुरुवात केली आहे. भाजपाचे तगडे उमेदवार म्हणून बहुसंख्य मतदारांनी दिनकर दहिफळेंच्या नावाची डरकाळी फोडल्यामुळे विरोधकांची अवस्था अशी चलबिचल होतांना दिसते. घोडामैदान बाकी आहे. भाजपाचे दिनकर दहिफळे हे कोणत्या एका समाजापुरते सिमीत राजकारणी नाहीत. सर्वसमावेशक सामाजिक आणि राजकीय घडामोडींचा दांडगा चेहरा असल्याची बाब लपून राहिलेली नसून सर्वज्ञात आहे. त्यांच्या राजकीय इतिहासाची पन्ने हाताळल्यास विधानसभा, विधानपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती, मध्यवर्ती बँक निवडणूक असो की, नगरपरिषद, नगरपंचायतीची निवडणूक, ग्रामपंचायतीची अथवा कृषी उत्पन्न बाजार समितीची असेल वा अन्य कोणतीही लहान मोठी निवडणूक असेल त्यातील खाचखळगे कशी पार करायची ? यात दहिफळे पारांगत असल्याने ते अद्यापतरी पराभवाचे धनी ठरलेले दिसत नाहीत. अशा बलाढ्य उमेदवारांसमोर भावनिक साद घालणाऱ्यांचा निभाव लागेल असे वाटत नसल्याचे तर्कवितर्कांच्या मतमतांतरातून ऐकायला मिळतेय.

**उपाध्यक्ष असताना उमेदवारी टाळली**

प्रकाश राठोड यांना मा.आ.स्व.नाईकांनी नांदेड जिल्हा परिषदेवर उपाध्यक्षपदापर्यंत पोहोचवल्या नंतर २०१७ च्या निवडणूकीत त्यांच्या उमेदवारीला का 'खो' दिला? याचे आत्मचिंतन करण्यास भाग पाडण्यायोग्यच मा. आ. स्व. नाईकांनी पावित्रा घेतला होता, प्रकाश राठोड यांची स्पष्ट उमेदवारी नाकारल्याने विश्वासपात्र उमेदवार म्हणून सौ.संगिता प्रविण मॅकलवार यांना गोकुंदा गटाची उमेदवारी देऊन निवडून आणले. नाईकांनी कार्यकर्त्यांच्या खांद्यावर हात ठेवल्यास त्याचे भाग्य बदलण्याची ताकद त्यांच्यात होती.आजही मा. आ. स्व. नाईक हयात असते तर येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचे चित्र वेगळे राहिले असते. पण असो, राष्ट्रवादी काँग्रेस नेत्या श्रीमती बेबीताई नाईक यांनी पक्षसंघटन मजबूत करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे आतल्या गोटातून ऐकायला मिळते. विद्यमान पदाधिकाऱ्यांच्या पक्षसंघटनसह विविध कार्याचा आढावा घेऊन समिक्षा केल्यास हितावह ठरु शकते. फेरबदल करून होतकरू तरुणांच्या हाती बागदोर सोपवावी अशी मागणी होत असल्याचे ऐकायला मिळते.

# नरसीमध्ये भरदिवसा धाडसी घरफोडी

नायगाव/प्रतिनिधी- नरसी येथील पप्पन गायकवाड यांच्या घरी दि.८ ऑक्टोबर रोजी दुपारी चोरीची घटना घडली आहे. चोरट्यांनी ३ लाख ८० हजार रुपये रोख आणि १५ ग्रॅम सोने लंपास केले आहे. मात्र, ४८ तास उलटूनही चोरीची फिर्याद दाखल झाली नसल्याचा आरोप होत असून, यामुळे रामतीर्थ पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

गायकवाड यांच्या घराचे बांधकाम सुरू असल्याने त्यांनी रोख रक्कम घरात ठेवली होती, असे सांगण्यात येते. रामतीर्थ पोलीसांनी चोरीला गेलेली रक्कम कुठून आली, याचा पुरावा मागितल्याचा आरोप आहे. पुरावा दिल्यानंतरच रोख रकमेच्या चोरीची फिर्याद घेण्यात येईल, असे सांगितल्याचा दावाही करण्यात येत आहे. चोरीला गेलेल्या मालमत्तेची नोंद घेऊन तपास करणे अपेक्षित असताना, ४८ तासांनंतरही फिर्याद दाखल न झाल्याने तक्रारदारांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकरणात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष घालून तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे. नरसीमध्ये भरदिवसा घरफोडीची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

# चिकन्यातील सात तलावांवर अतिक्रमण;हजारो एकर शेती वाळवंट होण्याच्या मार्गावर

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद तालुक्यातील मौजे चिकना येथील सात ऐतिहासिक तलावांवर अतिक्रमण झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या अतिक्रमणामुळे तलावांची पाणी साठवण क्षमता बाधित होत असून, परिसरातील हजारो एकर शेतीला सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्याचा प्रश्न निर्माण झाल्याने वाळवंट होण्याच्या मार्गावर आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी खा.रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी ८ ऑक्टोबर रोजी पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देऊन सातही तलावांची अधिकृत मोजणी करण्याची मागणी केली.

चिकना येथील जलालसाब तलाव, खजिन तलाव, रोड्डे तलाव, लाल कुंदा तलाव, कुंठा तलाव, पोच्चमा तलाव आणि दिवान तलाव या सात तलावांवर अतिक्रमण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या तलावांमध्ये पुरेसा पाणीसाठा होण्यास अडथळे निर्माण होत असल्याने परिसरातील शेतीच्या सिंचनाचा प्रश्न गंभीर बनत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तलावांच्या मूळ क्षेत्राची आणि प्रत्यक्ष उपलब्ध जागेची अधिकृत मोजणी केल्यास अतिक्रमणाचे नेमके स्वरूप स्पष्ट होऊ शकेल. तलाव हे ग्रामीण भागातील शेतीसाठी पाण्याचे महत्त्वाचे स्रोत आहेत. तलावांचे क्षेत्र कमी झाल्यास किंवा पाणी साठवणुकीवर परिणाम झाल्यास त्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसू शकतो. त्यामुळे तलावांचे मूळ क्षेत्र सुरक्षित ठेवणे, अतिक्रमणाची तपासणी करणे आणि संबंधित नियमांनुसार पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र, या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाने दुर्लक्ष करू नये, अशी भूमिका खासदार चव्हाण यांनी घेतली आहे.सातही तलावांची तातडीने अधिकृत मोजणी करून अतिक्रमण आढळल्यास ते नियमानुसार हटविण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी खा.चव्हाण यांनी केली आहे. तलावांच्या जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या पाण्याच्या हक्कासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलली नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.आता पाणीपुरवठा विभागासह संबंधित महसूल व स्थानिक प्रशासन या प्रकरणाची दखल घेऊन प्रत्यक्ष मोजणी करणार का, अतिक्रमणाबाबत कोणती कार्यवाही करणार आणि शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न कसा सोडविणार, याकडे चिकना परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# एकस्तर वेतनश्रेणीचा प्रश्न मार्गी लावणार; आ.भीमराव केराम यांचे शिक्षकांना आश्वासन

किनवट/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने एकस्तर पदोन्नती वेतनश्रेणीच्या प्रलंबित प्रश्नासंदर्भात आज (९ ऑक्टोबर) किनवटचे आ.भीमराव केराम यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. चर्चेदरम्यान आमदारांनी तात्काळ प्रश्न मार्गी लावण्याचे सकारात्मक आश्वासन दिले आहे.

शिक्षकांच्या पदोन्नती व वेतनश्रेणीबाबत गेल्या काही काळापासून अडचणी निर्माण झाल्यामुळे शिक्षकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. प्राथमिक शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी (दि.९ ऑक्टोबर) रोजी सकाळी आ.केराम यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले आणि त्यावर सविस्तर चर्चा सुद्धा करण्यात आली. आमदारांनीही तातडीने मार्ग काढण्याचे सकारात्मक आश्वासन दिले. शिक्षकांच्या शिष्टमंडळामध्ये जगदीश कोमरवार, विजय पेन्दोर, रामेश्वर आत्राम, भुजंग मेश्राम, वैभव मेश्राम, तानाजी टेकाम, कोवे, डवरे, मारुती मडावी, दिपक कुडमेते, प्रविण बनवस्कर व किसन धुर्वे आदी पदाधिकारी व शिक्षक उपस्थित होते.



# इंदिरा गांधी महाविद्यालयात भूगोल अभ्यास मंडळाचे उद्घाटन

नांदेड/प्रतिनिधी-सिडको नवीन नांदेड येथील इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर भूगोल विभाग व संशोधन केंद्राच्या वतीने भूगोल अभ्यास मंडळ मंडळाचे उद्घाटन व भूगोलाच्या शोध वाटा या अभिनव उपक्रमाचा उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी उद्घाटक व मार्गदर्शक म्हणून महात्मा फुले हायस्कूल बाबानगर नांदेड येथील मुख्याध्यापक डॉ. अण्णा गरड हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे होते.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. अण्णा गरड म्हणाले की, भूगोल विषयांमध्ये विद्यार्थ्यांना करिअरच्या असंख्य संधी आहेत, त्या संधीचा शोध घेऊन विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवावे. ते पुढे म्हणाले की, पर्यावरणाचे संवर्धन करायचे असेल तर भूगोल विषयाच्या अभ्यासाची आवश्यकता आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे म्हणाले की, भूगोल विषय हा मानवाच्या जीवनाशी प्रत्यक्ष संबंध असलेला विषय आहे. भूगोलाचा मानवी जीवनावर प्रभाव असतो व पर्यावरणाची जनजागृती करण्यासाठी, पृथ्वीचे संवर्धन करण्यासाठी भूगोल विषयाचा अभ्यास महत्त्वाचा आहे. भूगोल विभाग प्रमुख डॉ. नामदेव वाघमारे यांनी प्रास्ताविक करताना कार्यक्रम आयोजित करण्याचा उद्देश स्पष्ट केला. याप्रसंगी भूगोल विभागाद्वारे वसुंधरा या भितीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. भूगोल अभ्यास मंडळाचा अध्यक्ष दीपक कांबळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर सूत्रसंचालन कुमारी सेजल गरगडे हिने केले, तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ममता वाघमारे या विद्यार्थिनीने केले. या कार्यक्रमासाठी प्रा. संध्या आढाव, डॉ. कविता बोधले, डॉ. अर्चना दुडे, डॉ. लक्ष्मण काळे, डॉ. हनुमंत भोपाळे, डॉ. केदार साळुंखे, डॉ. रंजना अडकिने, डॉ. पूनम शर्मा, डॉ. मंजुषा कोल्हे, प्रा. विद्या काकडे, संगीता जोंधळे व पदवी व पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते.

# दुष्काळग्रस्त भागात रोजगार हमीच्या कामांना गती द्यावी

## राहुल पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



नायगाव/प्रतिनिधी- मराठवाड्यातील दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आणि पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी रोजगार हमी योजनेच्या कामांना मोठ्या प्रमाणावर गती द्यावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे नायगाव तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

अनियमित पाऊस, वाढते तापमान आणि बदलत्या हवामानामुळे शेतीसमोर पाणीटंचाईचे संकट निर्माण होत आहे. याचा परिणाम शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीवर होत आहे. त्यामुळे रोजगार हमी योजना केवळ मजुरीपुरती मर्यादित न ठेवता रोजगारनिर्मिती, जलसंधारण आणि शेतकरीहित यांचा समन्वय साधून व्यापक अभियान राबवावे, असे राहुल पाटील शिंदे यांनी म्हटले आहे.दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या गावांमध्ये रोजगार हमीची कामे तातडीने सुरू करावीत. मजुरांना काम मिळविताना येणाऱ्या अनावश्यक प्रशासकीय अडचणी आणि डिजिटल प्रक्रियेतील तांत्रिक अडथळे दूर करावेत. फेस ऑथेंटिकेशन, मोबाइल नेटवर्क किंवा अन्य तांत्रिक कारणांमुळे प्रत्यक्ष काम करणाऱ्या मजुरांची मजुरी अडकू नये, यासाठी पर्यायी पडताळणीची व्यवस्था करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या शेतात सिंचन विहिरी, विहिरींचे पुनर्भरण, शेततळे, बांधबंदिस्ती आणि कँपार्टमेंट बंडिंगची कामे मोठ्या प्रमाणावर मंजूर करावीत. तसेच गावांतील नाले, ओढे, नाला खोलीकरण, रुंदीकरण, नाला बंधारे, सिमेंट नाला बांध, गॅबियन स्ट्रक्चर, पाझर तलाव आणि गाव तलावांची कामे आवश्यकतेनुसार हाती घ्यावीत. पाझर तलाव, गाव तलाव आणि जुन्या जलसाठ्यांमधील गाळ काढून पाणी साठवण क्षमता वाढवावी. काढलेला गाळ शेतीसाठी वापरण्याची व्यवस्था करावी. जलयुक्त शिवार अभियानाच्या धर्तीवर गावनिहाय पाणी अडवा-पाणी जिरवा आणि भूजल पुनर्भरणाची एकात्मिक योजना राबवावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. रोजगार हमी, जलसंधारण आणि शेतकरीहित या तिन्ही बाबींचा एकत्रित विचार करून दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी भाजपा युवा मोर्चाचे नायगाव तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# सलगरा-बेटमोगरा रस्त्याची दुरवस्था

## डांबरीकरण करुन रस्ता दुरुस्त करण्याची मागणी

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड तालुक्यातील सलगरा ते बेटमोगरा या महत्त्वाच्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांसह नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावरील खड्डे आणि उखडलेल्या पृष्ठभागामुळे अपघाताचा धोका वाढला असून, संबंधित प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

सलगरा येथून बाबलगाव, धामणगाव, डोंगरगाव यांसह शंकरनगरमार्गे देगलूरकडे जाण्यासाठी हा रस्ता महत्त्वाचा दुवा मानला जातो. ग्रामीण भागातील नागरिकांच्या दळणवळणासाठी हा मार्ग अत्यंत उपयुक्त असतानाही, अनेक वर्षांपासून रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रश्न प्रलंबित असल्याने नागरिकांना हाल सहन करावे लागत आहेत. मुखेड तालुक्यातील बहुतांश गावांना जोडणाऱ्या रस्त्यांची कामे वेगाने सुरू असल्याचे सांगितले जात असले, तरी सलगराबेटमोगरा रस्त्याची परिस्थिती मात्र जैसे थे आहे. रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत असून, या मार्गावरून प्रवास करताना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या रस्त्यावरून दररोज कामानिमित्त प्रवास करणारे नागरिक, शेतमाल बाजारपेठेत नेणारे शेतकरी तसेच शाळा-महाविद्यालयांत जाणारे विद्यार्थी यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे वेळ आणि श्रम वाया जात असून, नागरिकांना मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, सलगराबेटमोगरा रस्त्याच्या प्रलंबित प्रश्नाबाबत माजी आ.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्याशी संपर्क साधण्यात आला असता, त्यांनी रस्त्याची अवस्था बिकट असल्याचे सांगत तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर नांदेड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५०२/२०२६
(समक्ष श्रीमती के.बी.सोनवणे)
पुढील तारीख : २५/११/२०२६

अर्जदार : चेतन पि.सखाराम सावंत वय ३२ वर्ष, धंदा : खाजगी नौकरी रा.प्रभातनगर, श्रीनगर, नांदेड मो.क्र.९५२७१४५३५८

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

दावा : कलम २ आणि ३ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे, मयत लक्ष्मीबाई भ्र. सखाराम सावंत ही दिनांक १२/२/२००७ रोजी आणि सखाराम पि.केरोजी सावंत दिनांक ४/१०/२००७ रोजी मरण पावले आहेत. अर्जदार हा मयताचा मुलगा आहे.

वर नमुद अर्जदारा शिवाय इतर कोणीही मयताचे कायदेशीर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे. अर्जदाराने मा.न्यायालयात अर्जदारांचे नावे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक २५/११/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ९/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
३ रे सह दिवाणी न्यायाधिश
कनिष्ठ स्तर,नांदेड

स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ
स्तर,नांदेड

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नांदेड यांच्या न्यायालयात
(समक्ष श्रीमती के.बी.सोनवणे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४३८/२०२६
कविता वि. निरंक

अर्जदार : १. कविता भ्र.बालाजी खुपसे वय : ४१ वर्षे धंदा : घरकाम, २. कुणाल पि.बालाजी खुपसे वय : १९ वर्षे धंदा : शिक्षण रा. लेबर कॉलनी ऑपॉझिट आयटीआय नांदेड, ३. कलावतीबाई भ्र. माधवराव खुपसे वय : ७० वर्षे धंदा : घरकाम रा.विष्णुनगर, शिवाजीनगर, नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत बालाजी पि. माधवराव खुपसे यांचे वारस आहेत. मयत बालाजी पि.माधवराव खुपसे यांचा १५/०६/२००८ रोजी मृत्यु झाला आहे. वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक ०५/११/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०७/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
३ रे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

"आदेशावरुन"
स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

# भक्ती गणेश मंडळाला प्रथम तर विद्यार्थी गणेश मंडळास द्वितीय पुरस्कार जाहीर

कुंडलवाडी/प्रतिनिधी-पोलीस स्टेशन कुंडलवाडी व के.रामलू सामाजिक प्रतिष्ठान, कुंडलवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या गणराया पुरस्कारांची निवड करण्यात आली आहे.

भक्ती गणेश मंडळाला मिळाला तर या स्पर्धेत श्री. विद्यार्थी गणेश मंडळाने द्वितीय, तर वंजारी समाज वंजारी गणेश मंडळाने तृतीय क्रमांक मिळविला. याशिवाय उत्कृष्ट सामाजिक, धार्मिक व विधायक उपक्रम राबविणाऱ्या मंडळांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आले. यामध्ये नरागल्ली गणेश मंडळ, संगमेश्वर गणेश मंडळ (महालक्ष्मी मंदिर), हिंदवी गणेश मंडळ, शिव छत्रपती गणेश मंडळ नागणी, सार्वजनिक गणेश मंडळ हुनगुंदा आणि सार्वजनिक गणेश मंडळ चिरली यांचा समावेश आहे. गणेशोत्सवाच्या काळात मंडळांनी सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविले. पर्यावरण संवर्धन, सामाजिक प्रबोधन, धार्मिक कार्यक्रम, विद्यार्थी व गुणवंतांचा सन्मान तसेच समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून गणेशोत्सवाला विधायक स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या विविध उपक्रमांची दखल घेत पुरस्कारांची निवड करण्यात आली. स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. रविकांत शिंदे, डॉ. नरेश बोधनकर आणि सायारेड्डी ठक्कुरवार यांनी काम पाहिले. मंडळांच्या विविध उपक्रमांचे परीक्षण करून त्यांच्या कामगिरीच्या आधारे पुरस्कारांची निवड करण्यात आली. दरम्यान, एक गाव, एक गणपती या संकल्पनेला प्रोत्साहन देण्यासाठीही विशेष पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. डौर, मनूर, संगम, विळेगाव (थडी), चिरली, माष्टी, दौलापूर, कोटग्याळ, शेळगाव (थडी), गुजरी, नागणी, हरनाळी, अर्जापूर, सुलतानपूर, नाग्यापूर आणि कार्‍हाळ या गावांनी एक गाव, एक गणपती उपक्रम राबविला असून, या गावांना विशेष पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. पुरस्काराच्या निकालाची घोषणा सहायक पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर शिंदे यांनी केली. सदरील पुरस्कारांचे बक्षीस वितरण नवरात्रोत्सवाच्या काळात पोलीस स्टेशन, कुंडलवाडी येथे मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर शिंदे यांनी दिली. सदर स्पर्धा आयोजनामध्ये कै. के. रामलू साहेब सामाजिक प्रतिष्ठान तर्फे नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार यांचे सहकार्य लाभले.

# माहूर गडावर रविवार पासून नवरात्रोत्सवाचा भक्तिमय सोहळा

## दहा दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांची पर्वणी; लाखो भाविकांच्या आगमनाची अपेक्षा



**सरफराज दोसानी**

माहूर - महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक पूर्ण शक्तिपीठ म्हणून प्रसिद्ध असलेल्या माहूर गडावरील श्री रेणुका देवीच्या शारदीय नवरात्रोत्सवाला रविवार, दि. ११ ऑक्टोबरपासून घटस्थापनेने प्रारंभ होत आहे. या निमित्ताने गडावर पुढील दहा दिवस विविध धार्मिक विधी, महापूजा, महाआरती, कुमारिका पूजन, शतचंडी महायज्ञ आणि संगीत सेवेचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. देशाच्या विविध राज्यांतून लाखो भाविक या काळात रेणुका मातेच्या दर्शनासाठी माहूर गडावर दाखल होत असतात. त्यामुळे संपूर्ण गड परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

माहूर गडावरील वार्षिक उत्सवांमध्ये श्री रेणुका देवीचा नवरात्रोत्सव हा सर्वांत मोठा आणि महत्त्वाचा उत्सव मानला जातो. नवरात्राच्या पवित्र पर्वात भाविक आपल्या कुलस्वामिनीचे विधिवत पूजन करून दर्शन घेतात. तसेच आपल्या मनोकामना पूर्ण होण्यासाठी रेणुका मातेला साकडे घालतात. आई रेणुका मातेचा जयघोष आणि भक्तिमय वातावरणाने गडावर उत्सवाची रंगत वाढते. या पार्श्वभूमीवर श्री रेणुका देवी संस्थानच्या विश्वस्त समितीने प्रतिपदा ते विजयादशमीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन केले आहे.रविवार, दि.११ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ ते दुपारी ११.३० वाजेपर्यंत वैदिक मंत्रोच्चारांच्या गजरात श्री रेणुका मातेची महापूजा आणि घटस्थापना करण्यात येणार आहे. गणेशपूजन, वेदघोष, श्री दुर्गा शतचंडी पाठ आणि चतुर्वेद पारायणाला प्रारंभ होईल. त्यानंतर छबिना, महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि.१२ ते बुधवार, दि.१४ ऑक्टोबर दरम्यान वैदिक महापूजेसह कुमारिका पूजन होणार आहे. गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी फुलोरा, महाप्रसाद, छबिना आणि मुख्य महाआरतीनंतर ललिता पंचमीनिमित्त जागरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शुक्रवार, दि. १६ आणि शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी वैदिक महापूजा व कुमारिका पूजन होईल. रविवार, दि.१८ ऑक्टोबर रोजी शतचंडी महायज्ञासाठी देवतास्थापना करून हवनाला प्रारंभ करण्यात येणार आहे.

सोमवार, दि.१९ ऑक्टोबर रोजी रात्री ८ ते ९ या वेळेत शतचंडी महायज्ञाची पूर्णाहुती, महानैवेद्य आणि महाआरती होणार आहे. मंगळवार, दि.२० ऑक्टोबर रोजी श्री रेणुका देवीची वैदिक महापूजा, महाआरती, शस्त्रपूजन तसेच भगवान श्री परशुराम यांच्या पालखीचे सीमोल्लंघन होऊन नवरात्र महोत्सवाची सांगता करण्यात येणार आहे. रविवार, दि.२५ ऑक्टोबर रोजी अश्विन शुद्ध कोजागिरी पौर्णिमाही माहूर गडावर साजरी केली जाणार आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने माहूर गडावर भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता असून, धार्मिक विधी आणि संगीत सेवेच्या माध्यमातून भक्तांना आध्यात्मिक अनुभूती घेण्याची संधी मिळणार आहे. उत्सवाच्या नियोजनाची माहिती मंदिर संस्थानचे विश्वस्त चंद्रकांत भोपी व संजय कान्नव यांनी दिली.

# विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घ्या, मला आरोपी करा!-आ.रोहित पवार

पुणे:एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनातील आंदोलकांवर गुन्हे दाखल केल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आ.रोहित पवार आक्रमक झाले आहेत. विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याऐवजी माझ्यावर गुन्हे दाखल करा, अशी मागणी त्यांनी केली. विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आणू नका, असे आवाहन करत त्यांनी पुणे पोलिसांच्या कारवाईवर तीव्र नाराजी व्यक्त केली. पुण्याच्या पोलीस आयुक्तांचे डोके ठिकाणावर आहे का? असा संतप्त सवालही त्यांनी उपस्थित केला.

पुण्यातील एस. एम. जोशी पुलावर एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असून, आंदोलनाचा दहावा दिवस उजाडला आहे. या आंदोलनादरम्यान काही विद्यार्थ्यांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केल्याने वातावरण तापले आहे. या कारवाईचा जाब विचारण्यासाठी रोहित पवार यांनी विश्रामबाग पोलीस ठाणे गाठले. विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल केले जात असताना आपणही आंदोलनस्थळी उपस्थित होतो. आपण अधिक आक्रमकपणे भूमिका मांडत असतानाही आपल्यावर गुन्हा दाखल का केला नाही, असा सवाल त्यांनी पोलिसांना केला.रोहित पवार यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमधूनही पोलिसांच्या भूमिकेवर टीका केली. गरीब विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकरी कुटुंबांतील तरुण हे महाराष्ट्राचे भविष्य आहेत. अशा विद्यार्थ्यांना दहशतवादी आणि गुप्तहेर ठरवून बदनाम करणे चुकीचे असल्याचे त्यांनी म्हटले.

# डीपीच्या ठिणग्यांनी सोयाबीनच्या पेंड्या जळाल्या;बळीराजाच्या संकटात आणखी भर



देगलूर/प्रतिनिधी-आधीच दुष्काळाने कंबरडे मोडले,त्यात महावितरणच्या बिघडाच्या डावामुळे देगाव शिवारात विद्युत डीपीमधून पडलेल्या ठिणग्यांनी कापलेल्या सोयाबीनच्या पेंड्या जळून खाक झाले आहेत परिणामी महिला शेतकरी संकटात सापडली आहे. विशेष म्हणजे डीपी हलविण्याची विनंती एक दिवस आधीच करूनही दुर्घटना घडल्याने महावितरणच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

देगाव शिवारातील गट क्रमांक ११५ मध्ये महिला शेतकरी सौ. क्रांती एम. गायकांबळे यांची ६४ आर शेती आहे. शनिवार दि.१० ऑक्टोबर रोजी सोयाबीन कापणी सुरू असताना डीपीमधून ठिणग्या पडल्या आणि कापलेल्या सोयाबीनच्या काही पेंड्यांनी पेट घेतला. आधीच दुष्काळामुळे आर्थिक संकटात असलेल्या शेतकरी महिलेचे या घटनेत नुकसान झाले. संबंधित डीपी सुरक्षित ठिकाणी हलवावी अशी विनंती क्रांती गायकांबळे यांनी शुक्रवार ९ ऑक्टोबर रोजीच उपअभियंता चाटे यांच्याकडे केली होती. मात्र दुसऱ्याच दिवशी सोयाबीनच्या पेंड्या जळाल्याने संभाव्य धोका वेळीच का टाळला गेला नाही असा सवाल उपस्थित होत आहे. दुष्काळाने पीक संकटात त्यात विद्युत यंत्रणेच्या बिघाडाने हातात आलेल्या उत्पन्नालाही फटका;अशा परिस्थितीत शेतकऱ्याने दाद मागायची तरी कोणाकडे? असा संतप्त सवाल पीडित शेतकऱ्याने उपस्थित केला आहे. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनेची तातडीने चौकशी करून नुकसानीचा पंचनामा करावा व नियमानुसार भरपाईसाठी कार्यवाही करावी आणि संबंधित डीपी बांधावर किंवा मुख्य रस्त्यालगत सुरक्षित ठिकाणी हलवावी अशी मागणी पीडित महिला शेतकरी सौ. क्रांती गायकांबळे यांनी केली आहे.

# पळसवाडीत पांढऱ्या क्षारांचा काळा विळखा

## दूषित पाण्याने १५ जणांच्या किडन्या धोक्यात;आरोग्य पथक गावात दाखल

मुखेड/प्रतिनिधी-पिण्याच्या पाण्याच्या टाकीत साचलेले क्षारांचे जाड थर आणि ग्लासात तरंगणारे पांढरे कण... हे भीषण वास्तव आहे मुखेड तालुक्यातील येवती ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या पळसवाडी गावाचे. गेल्या तीन वर्षांपासून घशाखाली उतरणारे हेच क्षारयुक्त पाणी आता ग्रामस्थांच्या जीवावर बेतले असून, गावातील तब्बल १५ नागरिकांना किडनीच्या गंभीर आजाराने ग्रासले आहे. या धक्कादायक प्रकारामुळे खडबडून जागे झालेल्या आरोग्य विभागाने गावात धाव घेत युद्धपातळीवर तपासणी मोहीम सुरू केली आहे.

सुमारे ५०० लोकवस्ती असलेल्या पळसवाडीत पिण्याच्या पाण्यासाठी नागरिक खासगी बोअरवेलवर अवलंबून आहेत. मात्र, या पाण्यातील अतिप्रमाणातील क्षारांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. १५ जणांना किडनीचा विकार जडल्याची गंभीर माहिती समोर येताच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आकाश देशमुख आणि वैद्यकीय अधिकारी डॉ.चंद्रकांत दबडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ७ ऑक्टोबर रोजी गावाला भेट दिली. सध्या गावात समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक व सेविकांचे पथक तळ ठोकून असून घरोघरी जाऊन तपासणी करत आहे. नागरिकांचा रक्तदाब, मधुमेह आणि किडनीशी संबंधित लक्षणांची नोंद घेतली जात आहे. ही तपासणी जसजशी पुढे सरकेल, तसतशी बाधित रुग्णांची संख्या आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गावातील पाण्याच्या साठवणुकीच्या टाकीत क्षारांचे थर स्पष्ट दिसत असूनही स्थानिक प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. आरोग्य पथक गावात पोहोचले असले, तरी पंचायत समितीचे सबधित अधिकारी अद्याप गावाला भेट देण्याचे सौजन्य दाखवले नाही. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. केवळ कागदी सर्वेक्षण न करता गावात तातडीने शुद्ध आणि फिल्टरयुक्त पाण्याचा पुरवठा सुरू करावा, तसेच जिल्हा प्रशासनाने या गंभीर समस्येत थेट हस्तक्षेप करून कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी आर्त हाक पळसवाडीकर देत आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा शिवजयंतीपूर्वी अनावरण करावे

## नगरसेविका वंदना घाडगे यांची मागणी

उमरखेड/प्रतिनिधी-शहराच्या मध्यवर्ती भागातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा गेल्या अनेक वर्षांपासून बंदिस्त अवस्थेत असल्याने शिवप्रेमी आणि नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शिवजयंतीपूर्वी पुतळ्याचे उर्वरित काम पूर्ण करून त्याचे सन्मानपूर्वक अनावरण करण्यात यावे, अशी ठाम मागणी नगरसेविका वंदना सचिन घाडगे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून, त्यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण होण्याची शिवप्रेमी अनेक वर्षांपासून प्रतीक्षा करीत आहेत. मात्र, पुतळा अद्यापही बंदिस्त अवस्थेत असल्याने नागरिकांच्या भावना दुखावल्या जात असून, प्रशासनाच्या दिरंगाईबद्दल नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत आणि आगामी शिवजयंतीपूर्वी पुतळ्याचे अनावरण करावे, अशी मागणी घाडगे यांनी निवेदनातून केली आहे. दरम्यान, वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत सन २०२५-२६ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या सुशोभीकरणासाठी निधी मंजूर झाला आहे. या निधीचा योग्य विनियोग करून चौकाचे सुशोभीकरण करण्यासाठी नगरपरिषदेने स्वतंत्र ठराव मंजूर करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. तसेच, सुशोभीकरणाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, उमरखेड यांना आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्र तातडीने देण्यात यावे, अशी विनंती




निवेदनात करण्यात आली आहे. नगरपरिषद प्रशासनाने संबंधित ठेकेदाराला उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना द्याव्यात. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून शिवजयंतीपूर्वी पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी कालबद्ध नियोजन करावे, अशी आग्रही भूमिका वंदना घाडगे यांनी मांडली आहे.

# सराईत गुन्हेगार इरफान कुबडा आणि त्याच्या टोळी विरुद्ध मोका अंतर्गत कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील सराईत गुन्हेगार इरफान कुबडा व त्याच्या टोळी विरुध्द मोका अंतर्गत कारवाई पोलीसांनी केली आहे.

इरफान कुबडा व त्याच्या साथीदारा विरुद्ध विविध पोलीस ठाण्यात खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, प्राणघातक हत्याराने मारहाण व इतर स्वरुपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. सदरील गुन्हेगारांविरुद्ध पोलीसांनी प्रतिबंधात्मक कारवाई करुनही त्यांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीत बदल झाला नाही. उलट या गुन्हेगारांनी संघटीत होवून दहशत निर्माण करणे व इतर गंभीर गुन्हे सातत्याने करणे सुरुच ठेवले होते. शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांनी या गुन्हेगारांच्या टोळी विरुध्द मोका अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव तयार करुन जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्याकडे पाठविला होता. डॉ. नीलाभ रोहन यांनी सदरील प्रस्तावाचे निरीक्षण करुन मंजुरीसाठी पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांच्याकडे पाठविला होता. शहाजी उमाप यांनी सदरील प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. पोलीसांनी टोळी प्रमुख शेख इरफान उर्फ कुबडा शेख गुड्डू (वय २६) रा. मकदुमनगर, नवी आबादी, नांदेड, फिरदोस उर्फ शाहरुख असलम खान (वय ३१) रा. तेहरानगर, मोहम्मद परवेज उर्फ छोटू, मोहम्मद आसीफखान पठाण (वय ३५) रा.श्रावस्तीनगर, नांदेड, शेख इम्रान शेख गौस (वय २२) रा.दातार चौक,नवी आबादी, शेख अयान उर्फ अयान मार्क शेख लतीफ (वय २३) रा.लेबरकॉलनी,नांदेड यांच्या विरध्द मोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वैंजने हे करीत आहेत.

# दिल्लीत १,७०० हून अधिक आंदोलक ताब्यात

## तुषार गांधींनाही मुंबईत स्थानबद्ध केल्याचे वृत्त

नवी दिल्ली:राजधानी दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी, यूट्यूबर ध्रुव राठी आणि कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दीपके यांच्यासह अनेकांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. आतापर्यंत १,७०० हून अधिक आंदोलकांना ताब्यात घेण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची आणि विशेष सखोल पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रिया रद्द करण्याची मागणी करत हे आंदोलन पुकारण्यात आले आहे. आंदोलनात युवक, विद्यार्थी संघटना आणि विरोधी पक्षांचे पदाधिकारी सहभागी झाल्याने पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे.दरम्यान, या आंदोलनाचे पडसाद मुंबईतही उमटल्याचे वृत्त आहे. महात्मा गांधी यांचे नातू तुषार गांधी यांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेऊन डी. एन. नगर पोलीस ठाण्यात स्थानबद्ध केल्याची माहिती समोर आली आहे.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी आ.अंतापुरकरांचे एक महिन्याचे मानधन!

देगलूर/प्रतिनिधी-जिल्ह्यात कोरड्या दुष्काळाचे संकट गडद होत असताना शेतकरी बांधवांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघाचे आ.जितेश अंतापुरकर यांनी आपल्या एका महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार त्यांनी मुंबई येथील वर्षा या शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपल्या एका महिन्याच्या मानधनाचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सुपूर्द केला.

यंदा पावसाच्या अभावामुळे शेतीसमोर संकट निर्माण झाल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडण्याची भीती आहे. खरीप हंगामातील पिकांवर शेतकरी कुटुंबांचे वर्षभराचे



आर्थिक नियोजन अवलंबून असते. मात्र, पावसाअभावी पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सामाजिक बांधिलकी जपत मदतीसाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. याच भावनेतून आ.जितेश अंतापुरकर यांनी आपल्या एका महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्याचा निर्णय घेतला. शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट हे केवळ एका कुटुंबापुरते मर्यादित राहत नाही, तर त्याचे परिणाम संपूर्ण समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनावर होतात. शेतीतील उत्पन्न घटल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही परिणाम होतो. त्यामुळे संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात देणे, त्यांचे मनोबल वाढविणे आणि त्यांना पुन्हा उभे राहण्यासाठी बळ देणे ही समाजातील प्रत्येक घटकाची सामूहिक जबाबदारी आहे. आपल्या मानधनाचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सुपूर्द करून आ.जितेश अंतापुरकर यांनी या सामाजिक जबाबदारीचे भान जपले आहे.

पान १ वरुन

### दिल्लीत अभूतपूर्व नाकाबंदी;...

उभे राहिले आहे. नेतृत्व बदलून आंदोलन पुढे नेण्याचा पक्षाचा निर्धार आणि प्रशासनाची कठोर सुरक्षा भूमिका यामुळे दिल्लीतील घडामोडींना महत्त्व प्राप्त झाले आहे. आता अजिंक्य शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सीजेपी आंदोलन कसे पुढे नेते आणि ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर पुढील संघर्ष कोणते वळण घेतो, याकडे लक्ष लागले आहे. सीजेपीने यापूर्वी नीट परीक्षेतील कथित पेपरफुटीच्या मुद्द्यावरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन केले होते. आता मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी पक्षाने पुढे आणली आहे. मुंबईतील शिवाजी पार्क आणि बंगळुरू येथील आंदोलनांनंतर दिल्लीतील जंतर-मंतरवर शक्तिप्रदर्शन करण्याचा पक्षाचा प्रयत्न होता.

### महाटी घाटावर...

मुदखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक गणेश कराड हे रुजू झाल्यानंतर तीन ते चार दिवसातच डीआयजीच्या पथकाने महाटी घाटावर मोठी कारवाई केली आहे. महाटी शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेतीचा अवैध उपसा सर्रासपणे महसूल व स्थानिक पोलीसांच्या आशिर्वादाने सुरु आहे. यामधील काही रेती माफीयांना राजकीय आशिर्वाद असल्याने ते या भागात दहशत निर्माण करुन रेतीचा उपसा करीत असतात.

### दसरा सणास रविवार...

जवळपास एक लाख भाविक पोहचण्याची शक्यता आहे. दसरा निमित्त गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुरसाहिब येथे विशेष कीर्तन दरबार व दिवान कार्यक्रम होईल. तसेच दशहरा हल्ला महल्ला यात्रा पार पडेल. वरील कार्यक्रमात मोठ्या संख्येत भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. गुरुद्वारा बोर्डाने सणाची तयारी सुरु केली आहे. नांदेडमध्ये दसरा हल्ला-महल्ला साजरा करण्यासाठी निहंग सिंघांचे सहा दल दाखल होणार आहेत. या दलांचे नगिनाघाट, शिख छावणी, बंदाघाट परिसरात वास्तव्य राहणार आहे.

# आंदोलनाचा अधिकार हिरावून घेणारे तुम्ही कोण ?-राज ठाकरे

मुंबई/प्रतिनिधी- देशात आंदोलनं करायचीच नाहीत का? प्रश्न विचारायचेच नाहीत? आंदोलनाचा अधिकार हिरावून घेणारे तुम्ही कोण? असा सवाल मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमधून उपस्थित केला. दिल्लीतील जंतर-मंतरवरील आंदोलनकर्त्यांवरील पोलिसांच्या कारवाईवरून ठाकरे यांनी केंद्र सरकारवर टीका केली आहे.

कॉकरोच जनता पार्टीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनादरम्यान आंदोलकांची धरपकड सुरू असल्याच्या वृत्ताचा संदर्भ देत राज ठाकरे यांनी अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि लोकशाही अधिकारांचा मुद्दा उपस्थित केला. शांततेत आंदोलन करणाऱ्या तरुणांवर कारवाई करणे अयोग्य असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा दाखला देत त्यांनी लोकशाही मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. निवडणूक आयोगाच्या कामकाजात पारदर्शकता असावी, अशी मागणी करणे हा नागरिकांचा अधिकार आहे. विरोधी आवाज दडपण्याऐवजी सरकारने आंदोलकांचे म्हणणे ऐकून घ्यावे, असेही त्यांनी म्हटले. सत्ता कायमस्वरूपी नसते, असा इशारा देत राज ठाकरे यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

# तामसा येथे दोन लाखाची घरफोडी

नांदेड/प्रतिनिधी-तामसा येथील संभाजीनगर भागात एका घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी दोन लाख रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना गुरुवारी रात्री घडली आहे.

बालाजी बापूराव चंदनवार (वय ४७) रा.संभाजीनगर, तामसा यांच्या बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी आतमध्ये प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिणे व रोख रक्कम असा दोन लाख ४ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेला आहे. बालाजी चंदनवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तामसा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनी खेडकर हे करीत आहेत.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४